**प्रसिध्दी पत्रक** **दिनांक ०८/०४/२०२६**

**आलोसे -** रामेश्वर गुरुलिंगप्पा बिडकर, वय ४५ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद नीमतानदार, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पाथरी ता.पाथरी जि.परभणी रा.देवेगाव ता.पाथरी ह.मु.दिपनगर, तरोडा नाक्याजवळ सुरेवाड यांचे घरी किरायाने नांदेड. यांनी तक्रारदार यांच्याकडून ८,०००/- रुपये लाच स्विकारल्याने आलोसे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी यांच्या जाळयात.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | परभणी. |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे पाथरी जि. परभणी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे. |
| आलोसे यांचे नाव व पत्ता | रामेश्वर गुरुलिंगप्पा बिडकर, वय ४५ वर्षे, व्यवसाय नौकरी, पद नीमतानदार, उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पाथरी ता.पाथरी जि.परभणी रा.देवेगाव ता.पाथरी ह.मु.दिपनगर, तरोडा नाक्याजवळ सुरेवाड यांचे घरी किरायाने नांदेड जि.नांदेड. |
| लाच मागणी रक्कम | १२,०००/- ( बारा हजार रुपये ) |
| लाच स्विकृती रक्कम | ८,०००/- ( आठ हजार रुपये ) |
| सापळा अधिकारी | श्री.महेश पाटणकर, पोलीस उप अधीक्षक, लाप्रवि. परभणी |
| तपास अधिकारी | श्री. अल्ताफ मुलाणी, पोलीस निरीक्षक, लाप्रवि परभणी. |
| लाच मागण्याचा हेतु | भुमी अभिलेख विभागाकडुन पुनवर्सन करिता शेत जमीनीची मोजणी केली त्यावेळी जमीन कमी मोजण्यात आली असता तक्रारदार यांचे पुतने यांनी पुनर्मोजणी करण्यासाठी. |
| थोडक्यात माहिती | यातील तक्रारदार यांनी दि.०७/०४/२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की त्यांचे पुतने भालचंद्र देशमुख यांचे मौजे वडी ता.पाथरी येथील गट क्रमाक २४ मधील शेत जमीन ढालेगाव बंधाराचे बॅक वॉटर मध्ये गेली आहे. भुमी अभिलेख विभागाकडुन पुनवर्सन करिता शेत जमीनीची मोजणी केली त्यावेळी जमीन कमी मोजण्यात आली. तक्रारदार यांचे पुतने यांनी पुनर्मोजणी करिता अर्ज उपविभागीय अधिकारी पाथरी यांचेकडे केला. त्यांनी उपविभागीय अधिकारी पाथरी यांनी सर्व्हे करण्याचे आदेश उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पाथरी यांना दिला होता. त्यादरम्यान लोकसेवक बिडकर यांनी तक्रारदार यांना १५,०००/- रुपये लाचेची मागणी करत असलेबाबत तक्रार प्राप्त झाली.<br>त्यावरुन दि.०७/०४/२०२६ रोजी पडताळणी करिता तक्रारदार यांना पंच क्र. १ यांचेसोबत पाठवले असता भेट झाली नाही.लोकसेवक बिडकर यांनी तक्रारदार यांना दि.०८.०४.२०२६ रोजी सकाळी ०९:३० वाजता उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पाथरी येथे भेटण्यासाठी बोलविले. त्यावरून लाच मागणी पडताळणी कार्यवाही करिता तक्रारदार व पंच क्र.१ यांना लोकसेवकाचे कार्यालयात भेट घेण्यासाठी पाठविले असता लोकसेवक यांनी तडजोडीअंती तक्रारदार यांना १२,०००/- रुपये लाचेची मागणी पंचासमक्ष केल्याचे निष्पन्न झाले. सापळा कार्यवाही दरम्यान तक्रारदार व पंच हे उपअधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, पाथरी येथे गेले असता लोकसेवक यांनी तक्रारदार यांना राऊत यांचे कटींगचे दुकानसमोर , साई मंदिर रोडवर, भेटण्यासाठी बोलवले असता तक्रारदार व पंच तेथे जावून लोकसेवक यांची भेट घेतली असता, लोकसेवक रामेश्वर बिडकर यांनी ८,०००/- रुपये लाच रक्कम तक्रारदार यांच्याकडुन शासकीय पंचासमक्ष स्विकारलेवरुन आलोसे यांचे विरुध्द पो.स्टे पाथरी येथे गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. तसेच आलोसे यांच्या घराची घरझडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. |

सदर कार्यवाही पोलीस अधीक्षक श्री.संदीप पालवे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अशोक कदम यांच्या मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस उप अधीक्षक श्री. महेश पाटणकर, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग परभणी, यांनी केली आहे. त्यांना सदर कार्यवाही कामी सहा.फौज/निलपत्रेवार, पोह/१३६६ आदमे, पोशि/१००५ नागरगोजे ला.प्र. वि परभणी यांनी मदत केली.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागा तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग यांचेशी संपर्क साधावा.

संपर्क पत्ता :- १) **मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड**
:- २) कार्यालय पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी
नानलपेठ पोलीस स्टेशनच्या बाजुला , शनिवार बाजार, नानलपेठ परभणी.

ई - मेल :- १) spacbnanaded@mahapolice.gov.in
२) dyspacbparbhani@mahapolice.gov.in दुरध्वनी क्र :– 02452&220597

ऑनलाईन तक्रार ॲप्लीकेशन :- acbmaharastra.net टोल फ्रि क्रमाक १०६४
पोलीस अधीक्षक :- ९२२६४८४६९९
पोलीस उप अधीक्षक :- ९८७०३१३१५७ व्हॉटसअप क्रमाक - ९२७२२११०६४.

Facebook : Acb Parbhani
Instagram : acbparbhani
Youtube Channel
@ACBParbhani

Facebook page : Anti Corruption Bureau,Parbhani.
Twitter : @ACBPARBHANI
Find us on Google Map & Mappels india Map

(महेश पाटणकर)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, परभणी